स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२२२ दि. ०३/०९/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यव्यापी रोजगार महाकुंभ उपक्रमाबाबत...

संदर्भ: १.मा. कक्ष अधिकारी(शिक्षण), राज्यपाल सचिवालय, लोक भवन, मुंबई यांचे **RB/Edn.1/Gen-2026/CR-158/845,**दि. २४ ऑगस्ट, २०२६ रोजीचे पत्र
२.मा.प्र–कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी 'रोजगार महाकुंभ–महाराष्ट्र' हा व्यापक राज्यस्तरीय रोजगार उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तरी सोबतच्या परिपत्रकामधील माहिती महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन, आपल्या महाविद्यालयामधील पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांना दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी, 'रोजगार महाकुंभ–महाराष्ट्र' या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

RB/Edn.1/Gen-2026/CR-158/845

GOVERNOR'S SECRETARIAT
LOK BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

दिनांक २४ ऑगस्ट २०२६

प्रति,
सर्व कुलगुरु,
राज्य विदयापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय - दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यव्यापी रोजगार महाकुंभमध्ये सर्व विदयापीठांचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत विनंती.

आदरणीय महोदय/महोदया,

कृपया उपरोक्त विषयाबाबतचे सोबत जोडलेले श्री. मंगलप्रभात लोढा, मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभाग यांनी राज्यपाल महोदयांना लिहिलेले दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी चे पत्र पहावे.

या संदर्भात मला आपणांस अशी विनंती करण्याचे निर्देश आहेत की, सदर प्रकरणी आपल्या विदयापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविदयालयाच्या प्राचार्यांना सर्व पात्र व इच्छुक विदयार्थ्यांना या रोजगार महाकुंभमध्ये आपला सहभाग सुनिश्चित करणेबाबत आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत. या संदर्भात, महाकुंभ मेळाव्याच्या आयोजना संदर्भात आपल्या कार्यक्षेत्रांतील कौशल्य रोजगार उदयोजगता व नाविन्यता विभागाशी संपर्क साधून यासाठी आवश्यक ते सहकार्य घेण्यात यावे.

आदरपूर्वक,

Mormare
24.08.2026

(वंदना मोरमारे)
कक्ष अधिकारी (शिक्षण)

NIC Receipt
24/08/2026
No. 10842510

(05)

जा.क्र.मंत्री को उद्या.रोज.नावि./टिपणी/ /२० दि. 0605/2026



मंत्री

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व
नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

महामहिम राज्यपाल अवलोकनार्थ.

दिनांक : 18 AUG 2026

नमस्कार

**विषय:- दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यव्यापी रोजगार महाकुंभमध्ये सर्व विद्यापिठांचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत विनंती.**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून आणि त्यांनी सदैव जपलेल्या "युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती" या संकल्पनेला अनुसरून, राज्यातील प्रत्येक युवकाच्या हाताला काम मिळावे आणि त्याचे स्वप्न त्याच्याच गावात, तालुक्यात पूर्ण व्हावे, या भावनेतून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी, एकाच वेळी ५०० केंद्रांवर **रोजगार महाकुंभ** (रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह) आयोजित करण्यात येत आहेत.

उद्योग व सेवा क्षेत्रातील मनुष्यबळाची आवश्यकता निश्चित करून Vacancy Mapping करण्यात येत असून, त्यानुसार योग्य उमेदवारांना या **रोजगार महाकुंभमध्ये** प्राधान्याने सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार उमेदवारांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत ७ दिवसांचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू यांना या **रोजगार महाकुंभमध्ये** सर्व पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांचा त्यामध्ये सहभाग सुनिश्चित करण्याबाबत तसेच असे **रोजगार महाकुंभ** आयोजित करणेबाबत आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती आहे. यासाठी आवश्यक ते सहकार्य कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात करण्यात येईल.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांसाठी पुढील Google Form उपलब्ध करून देण्यात आलेला आहे: https://forms.gle/P8wCZXSKdxcq4Veb9

आपल्या निर्देशामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील अनेक युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल. अशा या राज्यव्यापी **रोजगार महाकुंभचे** ऑनलाइन उद्घाटन मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस, माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. आपले आशीर्वाद लाभावे, ही विनंती.

धन्यवाद

मंगल प्रभात लोढा
(मंगलप्रभात लोढा)

Hon'ble Governor directed that the prog. be conducted with help of Uni. & Skill Dev. Dept - organise meetings accordingly for execution of orders

प्रति,
मा.श्री.जिष्णू देव वर्मा जी,
माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

**कार्यालय पत्ता :** दालन क्र. २०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
**दूरध्वनी क्र. :** ०२२-२२०२ ५३०८/२२०२ ४५९२, **ई-मेल :** *min.skills@maharashtra.gov.in*

P/Edn

## "रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र"

## दिनांक 17 सप्टेंबर 2026 रोजी महाराष्ट्रभर एकाच दिवशी 800+ रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राइव्ह

### 1. पार्श्वभूमी

महाराष्ट्र शासनाच्या **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत** दिनांक 17 **सप्टेंबर 2026 रोजी "रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र"** हा व्यापक राज्यस्तरीय रोजगार उपक्रम आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध जिल्हे, तालुके, औद्योगिक क्षेत्रे, शासकीय व खासगी ITI, तांत्रिक विद्यालये, कौशल्य विकास केंद्रे, महाविद्यालये, विद्यापीठे, रोजगार कार्यालये तसेच इतर योग्य संस्थांमध्ये **एकाच दिवशी 800+ रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राइव्ह** विकेंद्रित पद्धतीने आयोजित करण्याचे नियोजन आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश **रोजगार इच्छुक युवक-युवती आणि उद्योग/आस्थापना यांना थेट एका व्यासपीठावर आणणे**, युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा आहे.

राज्यातील 800+ **ठिकाणी एकाच दिवशी रोजगार उपक्रम आयोजित करून** ग्रामीण, निमशहरी, आदिवासी व दुर्गम भागातील युवकांपर्यंतही रोजगाराच्या संधी पोहोचविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### 2. उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे

**"रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र"** या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- ITI उत्तीर्ण, डिप्लोमा धारक, पदवीधर, कौशल्य प्रशिक्षित व बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- मोठे उद्योग, MSME, स्थानिक उद्योग व सेवा क्षेत्रातील आस्थापनांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.
- Apprenticeship, Placement व Direct Recruitment च्या संधी वाढविणे.
- शक्य असल्यास कार्यक्रमाच्या दिवशीच Screening, Interview आणि Selection प्रक्रिया पूर्ण करून Offer Letter / Selection Letter / Letter of Intent देण्यावर भर देणे.
- शासन विभाग, उद्योग, शैक्षणिक संस्था, कौशल्य प्रशिक्षण संस्था व स्थानिक प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करणे.

- उमेदवारांचे Qualification / Trade / Skill नुसार उपलब्ध रिक्त पदे व योग्य नियोक्त्यांशी पूर्वमॅपिंग करणे.
- **युवा – कौशल्य – उद्योग – रोजगार संधी** यांना जोडणारी राज्यव्यापी परिसंस्था निर्माण करणे.

### 3. विविध विभाग व संस्थांची अपेक्षित भूमिका

**"रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र"** या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध शासकीय विभाग व संबंधित संस्थांचा समन्वित सहभाग आवश्यक राहील.

#### अ. उद्योग विभाग

उद्योग विभागाकडून पुढील सहकार्य अपेक्षित आहे:

- राज्यातील **मोठे उद्योग**, MSME, MIDC **क्षेत्रातील उद्योग व औद्योगिक संघटना** यांचा सहभाग वाढविणे.
- सहभागी उद्योगांकडून उपलब्ध रिक्त पदांची माहिती कार्यक्रमापूर्वी संकलित करणे.
- CII, FICCI, MCCIA, IMC व इतर औद्योगिक संघटनांशी समन्वय साधणे.
- उद्योगांच्या HR व Recruitment Teams यांचा प्रत्यक्ष किंवा Virtual / Video Interview स्वरूपात सहभाग सुनिश्चित करणे.
- स्थानिक औद्योगिक गरजांनुसार क्षेत्रनिहाय नियोक्त्यांचा सहभाग वाढविणे.

#### ब. उच्च व तंत्र शिक्षण विभाग

या विभागामार्फत पुढील बाबी अपेक्षित आहेत:

- विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, पॉलिटेक्निक व तंत्रशिक्षण संस्थांमधील Placement Cells **सक्रिय करणे.**
- दिनांक 17 **सप्टेंबर** 2026 **रोजी संस्थास्तरावर** Job Fair / Placement Drive आयोजित करण्यास प्रोत्साहित करणे.
- अंतिम वर्षातील विद्यार्थी, अलीकडे उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व पात्र माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.
- शैक्षणिक संस्था व सहभागी उद्योग यांच्यात समन्वय साधणे.
- आवश्यकतेनुसार मुलाखती व Placement प्रक्रियेसाठी संस्थांची पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

#### क. ग्रामविकास व पंचायत राज विभाग

या विभागामार्फत:

- **जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व ग्रामीण प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून** उपक्रमाची माहिती प्रसारित करणे.
- ग्रामीण व दुर्गम भागातील रोजगार इच्छुक युवकांची नोंदणी व Mobilisation करणे.
- पात्र युवकांना जवळच्या रोजगार महाकुंभ केंद्राशी जोडणे.
- पंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधी व संस्थांमार्फत प्रसिद्धी व युवकांचा सहभाग वाढविणे.

**ड. महसूल विभाग**

राज्यव्यापी स्वरूप लक्षात घेता महसूल विभाग व जिल्हा प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहील.

- **विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसील स्तरावरील यंत्रणा** यांच्या माध्यमातून समन्वय साधणे.
- जिल्हा व तालुका स्तरावर योग्य आयोजन स्थळे निश्चित करण्यास सहकार्य करणे.
- संबंधित शासकीय विभाग, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण करणे.
- जिल्हा व तालुका स्तरावर प्रसिद्धी व उमेदवार Mobilisation साठी सहकार्य करणे.
- कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन प्रशासकीय व व्यवस्थापकीय अडचणींचे तातडीने निराकरण करणे.

**ई. कृषी विभाग**

कृषी विभागाकडून पुढील सहकार्य अपेक्षित आहे:

- ग्रामीण व कृषी कुटुंबांतील रोजगार इच्छुक युवकांपर्यंत उपक्रमाची माहिती पोहोचविणे.
- **Agri-processing, Food Processing, Agri-business, FPO-संबंधित उद्योग, Logistics, Warehousing व कृषीपूरक क्षेत्रातील नियोक्ते** यांना उपक्रमाशी जोडणे.
- विभागाच्या जिल्हा व क्षेत्रीय यंत्रणेमार्फत व्यापक जनजागृती करणे.
- कृषी शिक्षण, प्रशिक्षण व संलग्न क्षेत्रांतील पात्र विद्यार्थ्यांचा व युवकांचा सहभाग वाढविणे.
- **Food Processing, Agri-Tech, Warehousing, Logistics आणि Rural Enterprises** या उदयोन्मुख क्षेत्रांतील रोजगार संधींना चालना देणे.

**फ. शालेय शिक्षण विभाग**

शालेय शिक्षण विभागामार्फत:

- संबंधित शैक्षणिक यंत्रणेद्वारे "रोजगार महाकुंभ"ची माहिती व्यापक स्वरूपात पोहोचविणे.

- **पात्र शालेय शिक्षण पूर्ण केलेले युवक, व्यावसायिक शिक्षणातील विद्यार्थी, तांत्रिक विद्यालयांतील विद्यार्थी व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधित युवक** यांचा सहभाग वाढविणे.
- पात्र युवकांमध्ये करिअर व रोजगाराविषयी जनजागृती करणे.
- आवश्यकतेनुसार व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण संस्थांशी समन्वय साधणे.
- विद्यार्थी, पालक व स्थानिक समुदायामध्ये उपक्रमाची प्रसिद्धी करणे.

### 5. प्रशिक्षण व रोजगारपूर्व तयारी

उमेदवारांची रोजगारक्षमता व मुलाखतीसाठीची तयारी अधिक सक्षम करण्यासाठी **प्रत्येक रोजगार महाकुंभ केंद्राशी शक्यतो किमान एक Training Partner जोडण्याचा प्रयत्न** करण्यात येईल.

उमेदवारांना पुढील विषयांवर अल्पकालीन रोजगारपूर्व मार्गदर्शन व प्रशिक्षण देता येईल:

- Soft Skills
- Communication Skills
- Resume Preparation
- Interview Skills
- Personality Development
- Workplace Behaviour
- Basic Employability Skills

यासाठी शासकीय ITI, तांत्रिक विद्यालये, महाविद्यालये, विद्यापीठे, कौशल्य विकास संस्था तसेच योग्य Training Partners यांचा सहभाग घेता येईल.

उमेदवारांनी केवळ रोजगार मेळाव्यात उपस्थित राहणे एवढाच उद्देश न ठेवता ते **मुलाखतीसाठी सक्षम व रोजगारासाठी तयार उमेदवार** म्हणून सहभागी होतील, यावर भर राहील.

### 6. स्वतंत्र डिजिटल नोंदणी व्यवस्था

प्रभावी नियोजन व समन्वयासाठी खालील चार घटकांसाठी स्वतंत्र **Google Forms आणि QR Codes** तयार करण्यात येतील:

1. **उमेदवार** / Job Seekers
2. **नियोक्ता / उद्योग**
3. **सहभागी संस्था** / Organisations
4. **रोजगार मेळावा प्रमुख** / Centre In-charge

नोंदणी प्रक्रिया सुलभ व वापरकर्त्यास अनुकूल राहण्यासाठी केवळ अत्यावश्यक माहिती संकलित करण्यात येईल.

उमेदवारांकडून शैक्षणिक पात्रता, Trade/Skill, अपेक्षित रोजगार क्षेत्र व Job Location, तर नियोक्त्यांकडून Job Role, Vacancies, आवश्यक Qualification/Skill व Job Location यांची माहिती घेतली जाईल.

प्राप्त माहितीनुसार कार्यक्रमापूर्वीच Candidate–Vacancy Matching करण्याचा प्रयत्न केला जाईल, ज्यामुळे उमेदवारांना संबंधित नियोक्ते व योग्य रोजगार केंद्राशी जोडणे सुलभ होईल.

नोंदणीकृत उमेदवार, नियोक्ता व संस्थांना विभागाकडून तत्परतेने प्राथमिक प्रतिसाद व आवश्यक मार्गदर्शन मिळावे यासाठी स्वतंत्र **Response Mechanism** विकसित करण्यात येईल.

**7. राज्यव्यापी प्रसिद्धी व सामाजिक सहभाग**

"रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र" ची माहिती राज्यातील प्रत्येक भागापर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वित प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येईल.

यासाठी पुढील माध्यमांचा वापर करता येईल:

- वृत्तपत्रे व मुद्रित माध्यमे
- इलेक्ट्रॉनिक माध्यमे
- सोशल मीडिया
- WhatsApp / SMS
- ITI, महाविद्यालये व विद्यापीठे
- रोजगार व कौशल्य विकास केंद्रे
- ग्रामपंचायती व पंचायत समित्या
- महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था
- स्थानिक लोकप्रतिनिधी
- औद्योगिक संघटना
- NGOs
- सामाजिक व धार्मिक संस्था
- युवक व समुदायाधारित संस्था

तळागाळात मजबूत संपर्क असलेल्या संस्था व संघटनांचा सहभाग घेतल्यास औपचारिक Placement व्यवस्थेपासून दूर असलेल्या रोजगार इच्छुक युवकांपर्यंतही या उपक्रमाची माहिती प्रभावीपणे पोहोचविता येईल.

**8. सहकार्याचे आवाहन**

"रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र" हा केवळ एका दिवसाचा रोजगार मेळावा न राहता **शासन, उद्योग, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संघटना आणि युवक यांना एका सामायिक व्यासपीठावर आणणारा व्यापक राज्यस्तरीय रोजगार उपक्रम** म्हणून राबविण्याचा उद्देश आहे.

या उपक्रमाच्या यशासाठी सर्व संबंधित शासकीय विभाग, जिल्हा प्रशासन, विद्यापीठे, महाविद्यालये, ITI, प्रशिक्षण संस्था, उद्योग, नियोक्ते, औद्योगिक संघटना, स्थानिक स्वराज्य संस्था व सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा राहील.

सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वित प्रयत्नातून **महाराष्ट्रातील प्रत्येक भागातील युवकांपर्यंत अधिकाधिक रोजगाराच्या संधी पोहोचविणे आणि उद्योगांना आवश्यक कुशल व रोजगारक्षम मनुष्यबळ उपलब्ध करून देणे** हे या उपक्रमाचे प्रमुख ध्येय राहील.

800+ **रोजगार केंद्रे • एक दिवस • हजारो नियोक्ते • लाखो रोजगार संधी**